# NUTP, CMP

## ... ह्या काय भानगडी आहेत बुवा?



**सेव्ह पुणे ट्राफिक मूव्हमेंट**

www.savepunetraffic.org

# ITS TIME TO GET YOUR LIFE BACK...!



- International & Domestic Tours
- International & Domestic Air Tickets
- International & Domestic Hotel bookings
- Honeymoon Packages
- Holiday Vouchers program for Employees
- Meeting, Conferences, Incentive travel and events for corporate
- Special Interest & Exotic Tours
- Visa Assistance
- Foreign exchange assistance
- Travel Insurance

Club Mahindra .travel

Holidays made easy.

1, Harmony House, 797/1A,
Bhandarkar Road, Pune 411004
TEL – 020 25670567 / 020 25673456
EMAIL – cmt.pune1@mahindraholidays.com

# NUTP, CMP

## ... ह्या काय भानगडी आहेत बुवा?

सेव्ह पुणे ट्राफिक मूव्हमेंट

www.savepunetraffic.org

ऑक्टोबर २०१३

भारताच्या शहरांची वाढ झपाट्याने होते आहे. पुण्यासारखी अनेक शहरं येत्या ३०-४० वर्षांमध्ये दुप्पट होतील. म्हणजे केवळ पुण्यातल्या सध्याच्याच लोकांचा नाही, तर आणखी तेवढ्याच लोकांचा वाहतुकीचा प्रश्न आपल्याला सोडवायचा आहे.

वाहतुकीच्या प्रश्नाची झळ प्रामुख्याने गरिबांना बसते. चालत किंवा सायकलने कामावर जाणेच त्यांना परवडते, पण वाहनांच्या वाढत्या लोंढ्यामुळे चालणे आणि सायकल वापरणे धोकादायक झाले आहे. बसने दूरवर जाणे, जुने वाहन घेणे हे त्यांना परवडत नाही. पोट भरण्यासाठी योग्य असे काम जवळच मिळेल असे सांगता येत नाही. चुकीच्या वाहतूक नियोजनाचा त्रास सगळ्यांनाच होतो; परंतु वाढता वाहतूक खर्च आणि अपघात ह्यांची झळ प्रामुख्याने चालणारे, सायकलस्वार, रस्त्यावर व्यवसाय करणारे अशा गरिबांना तुलनेने अधिक बसते.

अशा प्रकारच्या समस्या केवळ आपल्या देशातच नाहीत, तर जगभर आहेत; परंतु अलीकडच्या काळात काही देशांनी आणि शहरांनी त्यावर परिणामकारक उपाय शोधले आहेत.

**हे उपाय आपण आजवर केलेल्या उपायांपेक्षा खूप वेगळे आहेत.**

त्यामुळे केंद्र सरकारने जगभरातल्या अशा प्रकारच्या वाहतूक उपाययोजनांचा अभ्यास करून एक "राष्ट्रीय नागरी वाहतूक धोरण" बनवले आहे.

## हे धोरण म्हणजेच

## National Urban Transport Policy

## अर्थात

## NUTP

## ह्या NUTP ची तत्त्वे आणि उद्दिष्टे काय आहेत?

1. रस्त्याची जागा प्रत्येक माणसाला सारखी मिळायला हवी. "तुम्ही जेवढी मोठी गाडी घेऊन याल तेवढी जागा तुम्हांला" असे चालणार नाही.
2. पादचारी, सार्वजनिक वाहतूक आणि सायकलस्वार ह्यांना प्राधान्य द्यायला हवे.
3. खाजगी वाहनांना उत्तेजन देऊ नये.
4. वरील तत्त्वांनुसार शहरी वाहतुकीचे अभ्यासपूर्ण नियोजन करावे.

एक बस ४०-५० माणसे वाहून नेते, पण कारने जाणारी तेवढीच माणसे १०-१२ बसची जागा व्यापतात. म्हणजेच कारने अडवलेल्या जागेमुळे बसने जाणाऱ्या लोकांचा जास्त वेळ खर्च होतो. तसेच पादचारी आणि सायकलस्वार प्रदूषण करत नाहीत. त्यांच्या धडकेने कोणी मरत नाही. म्हणून पादचारी, बस आणि सायकली ह्यांना रस्त्याची अधिक जागा वापरू देणाऱ्या योजनांना केंद्र सरकार पाठिंबा देईल.

## सार्वजनिक वाहतूक

"सार्वजनिक वाहतूक केवळ गरिबांसाठी" हा दृष्टिकोन बदलून, सर्वांनाच आकर्षक वाटेल अशा सार्वजनिक वाहतुकीचे आराखडे तयार करण्यासाठी आणि त्यांच्या अंमलबजावणीसाठी केंद्र सरकार आर्थिक मदत करेल.

## सायकली

सायकल सुद्धा केवळ गरिबांसाठी हाही दृष्टिकोन आता बदलला आहे. सर्वांना सायकलने सगळीकडे जाता येईल अशा प्रकारे प्रगत देशही शहरांची रचना करत आहेत. भारतातही ते शक्य आहे असे दाखवून देणारा प्रकल्प एखाद्या शहराला उभारायचा असेल तर केंद्र सरकार त्याला मदत करेल.



## पार्किंग

शहरातल्या जागा महाग असतात. जागेचे दर लक्षात घेऊन खाजगी वाहनांना पार्किंग महाग असावे, तसेच शहराच्या मध्यवर्ती भागात तर ते अधिकच महाग असावे, त्यामुळे सार्वजनिक वाहतुकीला उत्तेजन मिळेल असे NUTP मध्ये म्हटले आहे. पार्किंग फुकट असेल तर बसने कोण जाईल?



## CMP म्हणजे काय?

ह्या राष्ट्रीय नागरी वाहतूक धोरणावर (NUTP वर) आधारित एक सर्वंकष वाहतूक आराखडा आपण पुण्यासाठी बनवला आहे. तोच Comprehensive Mobility Plan, किंवा CMP.


आपल्या पुणे शहराची वाहतूक व्यवस्था प्रामुख्याने चालणे, सार्वजनिक वाहतूक आणि सायकली ह्यांवर आधारित असावी असे त्यात म्हटले आहे. साहजिकच सर्व रस्त्यांना पदपथ असावेत, आवश्यक तेथे बस लेन आणि सायकल ट्रॅक असावेत.

अशा वाहतूक व्यवस्थेमध्ये खाजगी वाहनांच्या वापरास उत्तेजन मिळू नये हे ओघानेच आले! उड्डाणपुलांसारखे प्रकल्प खास करून खाजगी वाहनांचे हित पाहतात आणि परिणामी त्यांच्यामुळे अधिक वाहने रस्त्यावर येतात असे CMP मध्ये स्पष्टपणे म्हटले आहे.

हा आराखडा पुणे महापालिकेच्या सर्वसाधारण सभेने मंजूर केला आहे.

ह्या आराखड्यानुसार पुण्याच्या वाहतुकीसाठी काही उद्दिष्टे ठरवली आहेत, ती अशी-

१. सार्वजनिक वाहतुकीचा हिस्सा (सध्याच्या सुमारे १२% वरून) सुमारे ३०-३५% वर नेणे.
    a. ह्या ३०-३५% पैकी मेट्रो सुमारे ५% भार उचलेल अशी योजना आहे. म्हणजे पीएमपी ने २५-३०% भार उचलायला हवा.
२. सायकलींचा वापर (सध्याच्या सुमारे ८% वरून) २५% वर नेणे.
३. खाजगी वाहनांचा वापर (सध्याच्या सुमारे ४५% वरून) १०% पर्यंत खाली आणणे.



## NUTP आणि CMP चा एकत्रित विचार करून वाहतूक समस्या सोडवता येईल!

जगातली अनेक शहरे ह्याच प्रकारे विचार करून आणि तशा उपाययोजना आखून त्यांचा वाहतूक प्रश्न सोडवत आहेत. हा "एकत्रित विचार" कसा ओळखायचा?

आपल्या मनात वाहतूक प्रश्न सोडवायचे अनेक उपाय येत असतात. ते उपाय NUTP आणि CMP च्या चौकटीत बसतात का हे आपण तपासून पाहायचे. ह्या उपायांचे तांत्रिक विश्लेषण किचकट असले तरी खालील ठोकताळे बांधून आपल्या मनातला उपाय चांगला आहे की नाही ते ठरवणे अगदीच सोपे आहे. हे ठोकताळे असे-

१. ह्या उपायाचा फायदा खास करून पादचारी, बस, सायकली ह्यांपैकी कोणाला होईल का? किंवा सध्या खाजगी वाहने वापरत असलेले लोक सार्वजनिक वाहतूक वापरण्यास प्रेरित होतील का?

२. एखाद्या उपायामुळे खाजगी वाहन वापरणे सोपे किंवा स्वस्त झाले तर मग बस कोण वापरेल! तसे तर होत नाही ना? तीच जागा, तोच पैसा वापरून पादचारी, बस, सायकली ह्यांची सोय करता येईल का?

३. पादचाऱ्यांची सुरक्षितता वाढवण्याच्या नादात आपण त्यांना चढउतार तर करायला लावत नाही? आपण सुचवत असलेला उपाय पादचारी भरपूर वापरत असल्याचा अनुभव आहे का?

४. वाहतूक कोंडी सोडवण्याच्या प्रयत्नात आपण बस व सायकलींना खूप मोठा वळसा तर घालायला लावत नाही?

हे ठोकताळे आपल्या मनातील कल्पनांना लावून पाहिल्यास कोणत्या उपाययोजनांनी आपली वाहतूक सुधारण्याला हातभार लागेल हे सहज लक्षात येईल. उदाहरणार्थ-

१. मनपा च्या खर्चातून पीएमपी बसवर ठळक पाट्या बसवण्यासाठी तरतूद करणे.
२. स्वस्त किंवा मोफत पार्किंग पुरवण्यापेक्षा "पे ॲण्ड पार्क" चे उत्पन्न सार्वजनिक वाहतुकीवर खर्च करणे.
३. सर्व चौकांमधील झेब्रा पट्ट्या व पादचारी सिग्नल उत्तम अवस्थेत असणे आणि सिग्नलच्या चक्रात पादचाऱ्यांना पुरेसा वेळ असणे
४. एकेरी मार्गांमधून सायकली आणि पीएमपी बस ह्यांना सूट देणे.  त्यांच्यासाठी उलट दिशेची एक लेन राखून ठेवणे.

अशी अनेक उदाहरणे सुचू शकतील!

असा विचार करताना एक बाब ध्यानात ठेवायची आहे

**आपल्या महापालिकेच्या वाहतूक उपाययोजनांवर होणाऱ्या खर्चापैकी जितका अधिक हिस्सा पादचारी, बस आणि सायकलींवर खर्च होईल तितके चांगले.**

**कारण ह्या ३ साधनांनी ८०% वाहतूक करण्याचे आपले उद्दिष्ट आहे**.

प्रथमदर्शनी हा उलटा प्रवाह वाटेल, पचायला कठीण जाईल, पण “कोणत्याही वाहतूक योजना करताना वाहनांचा नव्हे तर लोकांचा विचार करा” हे NUTP चे सार जर आपल्या विचारसरणीत बाणवून घेतले तर मात्र हे सोप्पे वाटायला लागेल. आणि असे झाले तरच आपल्या मानगुटीवरचे वाहतूक कोंडीचे भूत उतरेल!

**लक्षात ठेवा-**

**८०% वाहतूक**

**पादचारी, बस, सायकलींनी!**

आणि हो - सरतेशेवटी एक महत्त्वाची गोष्ट.  पुण्याची वाहतूक सुधारण्यासाठी तिला ICU उपचारांची गरज आहे!

| | | |
|---|---|---|
| I | Integrated | एकात्मिक |
| C | Comprehensive | सर्वसमावेशक |
| U | Urgent | ताबडतोबीने |

अधिक माहितीसाठी पाहा-

"Pune Traffic on <u>Right</u> Track by 201<u>?</u>"

www.savepunetraffic.org  येथे

# Kelshi Glades

Fun, Sports & Healthy Holidays

## Green Vision

Through solar energy, water conservation, recycling and composting programs & innovative design, Kelshi Glades would be at the forefront of modern environmental stewardship.

## The Surroundings

- Clean Beach
- Beautiful Green Cover
- Historic Mahalaxmi Temple, Yakub Baba Darga Kadyvarcha Ganapati

## The Location

- Just 5 kms from the virgin beach at Kelshi
- Very near the proposed coastal highway
- Scenic Drive

## Our offer

20,000 sqft marked/fenced plot with "Open NA"
Farm house 500 sqft built with Red Jambha stone.

## The Place

- **14 acre of land with natural flora and fauna of Ayurvedic shrubs**
- **Hill slope with red Jambha stone good for Mango and Cashew Plantation**
- **Sea and Bharja River Valley view**


**INDIA :**

Amit : +91 98220 38974

Manjiri : +91 92255 10290

**USA**

Jeet : +1 980 229 0381

Anila : +1 980 229 0382

**info@kelshi.in**

**www.kelshi.in**